




दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ८ जानेवारी २०२५ | अंक ३० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


## धनंजय मुंडे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या आणि पवनचक्की कंपनीतील खंडणीसंदर्भातील आरोपामुळे अडचणीत आलेले राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांचा पाय आणखी खोलात जाण्याची शक्यता आहे. कारण धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा मुंडे यांनी आता मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. मुंडे यांनी त्यांच्या पहिल्या पत्नीची मालमत्ता तसेच त्यांच्यावर सुरू असलेल्या विविध खटल्यांची माहिती निवडणूक प्रतिज्ञापत्रात लपवल्याचा दावा करुणा मुंडे यांच्या वकिलांनी केला आहे. याबाबत ४ जानेवारी रोजी कोर्टात याचिका दाखल करण्यात आल्याचे वकिलांनी सांगितले. निवडणूक प्रतिज्ञापत्रात माहिती लपवण्यासह करुणा मुंडे यांचा परळी विधानसभा निवडणुकीतील अर्ज चुकीच्या पद्धतीने बाद करण्यासाठी धनंजय मुंडे यांनी दबाव टाकल्याचा आरोपही करुणा मुंडे यांच्या वकिलांनी केला असून याबाबत त्यांनी कोर्टात दाद मागितली आहे. करुणा मुंडे यांच्यामार्फत करण्यात आलेल्या या याचिकेवर पुढील आठवड्यात सुनावणी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, करुणा मुंडे यांच्या तक्रारीनंतर धनंजय मुंडे यांच्याविरोधात विविध ठिकाणी खटले सुरू आहेत. मात्र या खटल्यांची माहिती त्यांनी निवडणूक प्रतिज्ञापत्रात लपवल्याचा आरोप आहे. परळी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी ५८ उमेदवारांनी आपले नामनिर्देशन पत्र परळीचे निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांच्याकडे दाखल केले होते. नामनिर्देशन पत्र वेगवेगळ्या कारणाने अवैध ठरविण्यात आले. यामध्ये करुणा मुंडे यांच्या अर्जाचाही समावेश होता. करुणा मुंडे यांनी स्वराज्य शक्तीसेनेच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या अर्जामध्ये सूचकांच्या नावापुढे केलेल्या सह्या आपल्या नसल्याचे सूचकांनी नामनिर्देशनपत्र छाननी वेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सांगितले. त्यामुळे करुणा मुंडे यांचा अर्ज अवैध ठरवण्यात आला होता. दरम्यान, धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्या गुडांनी सूचकांवर दबाव टाकून सही बनावट असल्याचा दावा करण्यास सांगितल्याचा आरोप आता करुणा मुंडेंकडून करण्यात आला आहे.

## समाजसुधारक वाल्मीक कराडचे ५ वाईन शॉप-अंजली दमानिया

बीड । प्रतिनिधी जिल्ह्यातील मस्साजोग या गावातील पवनचक्की कंपनीकडे खंडणी मागितल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी वाल्मीक कराड याला सीआयडीने ताब्यात घेतले आहे, खंडणी प्रकरणावरुनच मस्साजोग गावचे सरंपच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याचा आरोप आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या प्रकरणी आक्रमक भूमिका घेतली आहे, दमानिया यांनी ट्विट करुन वाल्मीक कराड याच्या वाईन शॉपचा तपशील देत आरोप केले आहेत. वाल्मीक कराड याला अनेकांनी समाज सुधारक असं संबोधले आहे. यावरुन दमानिया यांनी समाज सुधार वाल्मीक कराड याचे चार ते पाच वाईन शॉप असल्याचा आरोप केला आहे. या ट्विटमध्ये अंजली दमानिया यांनी पुरावे दिले आहेत. वाल्मीक कराड याची केज, वडवनी, बीड आणि परळी येथे चार ते पाच वाईनशॉप असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच या प्रत्येक वाईन दुकानाचा बाजार भाव ५ कोटी इतका असल्याचा दावा करण्यात आला आहे

# मुख्यमंत्र्यांकडून बीड आणि परभणी प्रकरणात संवेदनशीलतेचं दर्शन



## देशमुख आणि वाकोडे कुटुंबियांना सर्वात मोठा दिलासा

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांमध्ये बीड आणि परभणी प्रकरणांमुळे राज्यातील राजकारण तापलं आहे. या दोन्ही घटनेतील पीडित कुटुंबियांना मोठा दिलासा देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. देशमुख यांच्या हत्येने त्यांच्या कुटुंबियांवर मोठं संकट कोसळलं आहे. देशम ुख कुटुंबियांना आधार देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी संतोष देशमुख यांच्या पत्नीला शासनात सामावून घेण्याचा म्हणजेच सरकारी नोकरी देण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे देशमुख यांची मुलं लहान असल्याने संतोष देशमुख यांच्या पत्नीला मस्साजोग गावापासून जवळ असलेल्या लातूरमध्ये नोकरी देण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय घेऊन संवेदनशीलतेचं दर्शन घडवून दिलं आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्र्यांनी परभणीतील घटनेवेळी हृदयविकारच्या तीव्र झटक्याने मृत्यूमुखी पडलेले आंबेडकरी नेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबियांबाबतही असाच निर्णय घेतला आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी याबाबत माहिती दिली आहे.सुरेश धस काय म्हणाले?ङ्कविजय बाबा वाकोडे हे मी पालकमंत्री असताना माझे मित्र होते. दुर्दैवाने त्यांचा जो अंत झाला आहे, परभणीत जे वातावरण झालं होतं ते शांत करण्यासाठी जी धावपळ केली गेली त्या धावपळीत त्यांचं दुर्दैवाने निधन झालं. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: सभागृहात सांगितलं होतं. अधिवेशन संपल्यानंतर मी स्वत: परभणीला गेलो होतो. परभणीला विजय बाबांच्या घरी गेल्यानंतर सर्व कुटुंबियांना विनंती केली होती की, आपण सर्वजण मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी मुंबईत यावं. मी मुख्यमंत्र्यांची वेळ घेतो. तिथले माजी आमदार सुरेश देशमुख, माजी महापौर सोनकांबळे, विजय वाकोडे यांचे थोरले आणि धाकटे चिरंजीव सर्वजण आले असं सुरेश धस यांनी सांगितलं.विजय वाकोडे यांचा एक मुलगा शासनानात घेण्याबाबतचा निर्णय झाला. तसेच ज्या ठिकाणी आंदोलन झालं ते स्थळ स्मृतीस्थळ होईल. विजय बाबांच्या अंत्यंविधीच्या ज्या ठिकाणी बोर्ड लावला गेला आहे तिथे स्मृतीस्थळ होईल. असे दोन्ही आश्वासन वाकोडे कुटुंबियांना दिले आहेत. जे फक्त ॲक्शन मोडमध्ये आंदोलक तरुण होते त्यांच्यावर कारवाई होईल. इतरांवर जे नोकरीस प्राप्त आहेत ते सर्व चार्जशीटमधून वगळण्यात येतील, असं मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिलं आहे अशी महत्त्वाची माहिती सुरेश धस यांनी दिली.

### संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांबाबत निर्णय काय?

संतोष देशमुख यांच्या पत्नीला लातूर जिल्ह्यात शासनात सामावून घेण्याचा निर्णय घेतला आहे. कारण संतोष देशमुख यांच्या मुलांचं शिक्षण थांबू नये, यासाठी मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय घेतला आहेअशी महत्त्वाची माहिती सुरेश धस यांनी दिली. एसआयटीमध्ये बदल करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी तात्काळ आदेश दिले आहेत. पुढील दोन दिवसांत एसआयटीत बदल झालेला दिसेल अशी देखील माहिती सुरेश धस यांनी दिली.

## कामगार जनजागृती कार्यक्रम संपन्न

बीड । प्रतिनीधी गावातील कामगारांमध्ये शासनाच्या विविध योजनांची जनजागृती करण्यासाठी २५ ऑगस्ट रोजी बाळ्या वस्तीवर जाऊन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये रस्त्यावरील कामगारांना त्यांच्या हक्कांबाबत तसेच शासनाच्या मजदूर योजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमामध्ये अनेक कामगारांना मजदूर नोंदणी प्रक्रिया व त्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची माहिती दिली गेली. यावेळी उपस्थित गावचे सरपंच यांनी कार्यक्रमाचे महत्त्व विशद केले, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सारिका यादव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.सर्व कामगारांना आपापल्या अधिकारांची आणि योजनांच्या लाभांची जाणीव करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित सर्वांनी आयोजकांचे आभार मानले.

## फडणवीसांसोबत नेमकी काय चर्चा झाली? मस्साजोगहून मुंबईत आलेल्या देशमुख कुटुंबियांचा खुलासा

**बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे महाराष्ट्राचे राजकारण तापलं आहे. भाजप आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणावरुन मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या दरम्यान आज महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. संतोष देशमुख यांचे कुटुंबिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी आज मस्साजोग गावाहून मुंबईत दाखल झाले. देशमुख कुटुंबियांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सागर' बंगल्यावर जावून त्यांची भेट घेतली. यावेळी देशमुख कुटुंबियांनी संबंधित प्रकरणावर मुख्यमंत्र्यांकडे सविस्तर भूमिका मांडली. यावेळी फडणवीस यांनी देशमुख कुटुंबियांना संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांवर कठोरात कठोर शिक्षा देऊ, असं आश्वासन दिलं. मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत काय चर्चा झाली? याबाबत माहिती दिली.**

## हवेत गोळीबार करणाऱ्याचा शस्त्र परवाना रद्द !



बीड। प्रतिनिधी संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील शस्त्र परवान्याचा मुद्दा हा प्रामुख्याने चर्चेत आला होता. त्यातच हवेत गोळीबार करून ते सोशल मीडियावर व्हायरल केल्याचे काही व्हिडीओ समोर आले होते. त्याच प्रकरणी हवेत गोळीबार करणाऱ्याला गुन्हा दाखल करून अटक करण्यात आले होते. पण आता शासनाने शस्त्र परवानाविषयी जोरदार कारवाई केली आहे. हवेत गोळीबार करणाऱ्या कैलास फड, माणिक फड, बाळासाहेब सोनवणे या तिघांसह गुन्हा दाखल असलेल्या तब्बल ७४ जणांचे शस्त्र परवाना रद्द करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी ही कारवाई केली आहे.मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणानंतर जिल्ह्यातील १२८१ शस्त्र परवान्याबाबत लोकप्रतिनिधींनी,सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. बीड जिल्ह्यात सर्वाधिक शस्त्र परवाने असल्याची माहिती समोर आले होते, कुणालाही शस्त्र परवाना दिल्याचा आरोप करत हे परवाने रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती. या अनुषंगाने पिस्तुलसह फोटो, व्हिडीओ असणाऱ्या कैलास फड, माणिक फड, बाळासाहेब सोनवणे यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तर गंभीर गुन्हे दाखल असलेल्या २३२ जणांचा शस्त्र परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव पोलीस प्रशासनाने जिल्हाधिकारी यांना पाठवला होता.

# केज हद्दीत गावठी पिस्टल व काडतुस जप्त, दोन आरोपींना अटक



नवनीत काँवत पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्या विरुध्द कडक कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध अग्निशस्त्राची गोपनिय माहिती काढणेबाबत अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. त्यावरुन दिनांक ०६/०१/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोह/ जफर पठाण यांना गुप्त बातमी मिळाली की, इसम नामे सोमनाथ राजाभाऊ चाळक रा.लहुरी ता.केज याचेकडे एक गावठी कट्टा असून तो लहुरी येथे जिल्हा परिषद शाळा जवळ थांबला आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळताच सदरची खबर पो.नि. श्री. उस्मान शेख यांना देवुन त्यांनी पुढील कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश पोह पठाण यांना दिले. त्यावरुन पोह पठाण यांनी सोबत स्थागुशा स्टाफ यांना घेवुन बातमी ठिकाणी जावुन सापळा लावला व लहुरी येथुन इसम नामे सोमनाथ राजाभाऊ चाळक रा.लाहुरी ता.केज हा यास ताब्यात घेवुन त्याचे जवळ कमरेला एक गावठी बनावटीची पिस्टल व दोन जिवंत काडतुस बेकायदेशीररित्या मिळुन आले. सदर आरोपीकडे अधिक चौकशी करता त्याने सदर गावठी पिस्टल विकास सुभाष सावंत रा.सावंतवाडी ता.केज जि.बीड याचेकडुन आणल्याने सांगितले त्यानंतर सुभाष सावंतचा शोध घेवुन त्यास सावंतवाडी येथुन ताब्यात घेतले आहे. आरोपीकडुन जप्त केलेला एक गावठी बनावटीची पिस्टल व दोन जिवंत काडतुस कि.अ.४२०००/- रु चा मुद्देमाल व वर नमुद दोन्ही आरोपी पो.स्टे.केज यांचे ताब्यात देण्यात आले असुन त्यांचे विरुध्द पो. स्टे.केज येथे भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालु आहे. नमुद दोन्ही आरोपींनी यापुर्वी पो.स्टे.केज, वडवणी ,युसुफ वडगाव, कळंब येथे पेट्रोलपंपावर कोयत्याचा धाक दाखवुन दहशत निर्माण करुन जबरी चोरीचे गुन्हे केले होते, स्थानिक गुन्हे शाखा,बीड ने या कोयता गँगचा पर्दाफाश करुन ०५ जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले होते. सदर आरोपींचा गुन्हे अभिलेख पाहता आरोपी १) विकास सुभाष सावंत रा.सावंतवाडी ता.केज याचेवर पुणे जिल्हया पो.स्टे.भारती विद्यापिठ (पुणे) येथे दरोडयाची तयारी ०१, मारहाणीचा ०१, पो. स्टे.सिंहगड (पुणे) येथे चोरीचा ०१ व अग्निशस्त्र बाळलेला ०१ गुन्हा तसेच बीड जिल्हयात कोयत्याचा धाक दाखवुन जबरी चोरीचे ०३ व धाराशिव जिल्हयात ०२ असे गुन्हे दाखल आहेत. आरोपी नामे सोमनाथ राजाभाऊ चाळक रा.लहुरी ता.केज याचे वरील बीड जिल्हयात कोयत्याचा धाक दाखवुन जबरी चोरी करणेचे ०३ व धाराशिव जिल्हयात ०२ गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी मा.श्री. नवनीत काँवत पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोह/जफर पठाण, महेश जोगदंड, तुषार गायकवाड, बप्पासाहेब घोडके , चालक गणेश मराडे यांनी मिळुन केली आहे.

## संपादकीय

## बालमनावर संस्कार करणाऱ्या आनंददायी बालकथा

लेखक रवींद्र जवादे हे आजच्या पिढीची आघाडीचे लेखक आहेत. बालसाहित्य क्षेत्रात त्यांची भरीव कामगिरी आहे. मोजकेच पण दर्जेदार लेखन यामुळे ते महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. त्यांना अनेक नामवंत कला संस्थांचे अनेक पुरस्कार आहेत. छोट्या बाल दोस्तांसाठी त्यांचा नुकताच प्रकाशित झालेला चिंटू अस्वल आणि त्याचे घर हा कथासंग्रह मुलांना कमालीचा आवडत असून त्याविषयी ते अभिप्राय देत आहेत. एक होता तेज:पुंज ही बालकादंबरी व एक होती परी या बालकाव्यसंग्रहाच्या यशानंतर ते मुलांसाठी चिंटू अस्वल आणि त्याची घर हा सुंदर कथासंग्रह घेऊन आली आहेत. या कथासंग्रहात एकूण सहा कथा असून मुलांना मुलांना मनोरंजनाबरोबरच संस्कारक्षम कथांची मेजवानी यात आहे. सर्वच कथा वाचनीय असून विद्यार्थ्यांचा भावनिक विकास करणाऱ्या आहेत. चिंटू अस्वल आणि त्याचे घर या शीर्षक कथेत स्वतःचं घर नसलेल्या चिंटू अस्वलाला जंगलात एक दिवस वादळाचा सामना करावा लागतो. तेव्हा तो आसऱ्यासाठी आपल्या मित्रांकडे जातो परंतु कोणीही त्याला मदत करत नाही. त्यांच्या घरावर पाटी लिहिलेली असते बाहेरच्यांना घरात प्रवेश नाही. त्या वेळी कोणीही त्याला मदत करत नाही. तेव्हा चिंटू अस्वल दुसऱ्या जंगलात जातो व तेथे आपले स्वतःचे घर बांधतो व तो त्या घरावर लिहितो या घरात सगळ्यांचे मनापासून स्वागत आहे. गोष्टीचा केलेला हा गोड शेवट मुलांना विचार करायला प्रवृत्त करतो व त्यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोन टाकतो. प्रवेश निषेध या गोष्टीत प्राणी माणसाला जंगलात प्रवेश द्यायचा नाही या निर्णयापर्यंत येतात. माणसाचा स्वार्थी स्वभाव यात अधोरेखित केला आहे. शेवटी सृष्टीच्या विनाशाला कदाचित माणूसच कारणीभूत ठरू शकतो असा विचार या ठिकाणी मनात येऊन जातो. कारण इतर प्राण्यापेक्षा माणसानेच निसर्गाचे नियम तोडले आहेत. माणसाने बेसुमार केलेली वृक्षांची तोड, प्राण्यांची होत असलेली शिकार, कृत्रिम गोष्टींमुळे पशुपक्ष्यांना होत असलेला त्रास या समस्यांकडे या कथेतून लक्ष वेधण्याचा लेखकाने अचूक प्रयत्न केला आहे. पुर ही कथा नितीन नावाच्या धाडसी मुलाची आहे. पुराच्या पाण्यात शुभम वाहून गेला असताना नितीनने धाडसाने त्याला वाचवले. ही कथा वाचताना वाचक नकळतपणे त्यात गुरफटून जातो. संकटाच्या वेळी मदत करण्याचा संदेश या कथेतून बाल दोस्तांना मिळतो. चारुलता जाते शाळेत ही कथा एका हुशार मुलीची आहे. परिस्थितीची जाण असलेली ही मुलगी घरच्या परिस्थितीमुळे शाळा सोडून देते. परंतु शिक्षकाच्या सतर्कतेमुळे पुन्हा चारुलताला शिकण्याची संधी मिळाली. इतरांना नेहमी मदत करणारी चारुलता अभ्यासातही हुशार असते? एक दिवस शाळेत एक साप स्नेहलच्या पायापाशी आला. तेव्हा चपळतेने चारुलताने सापाचे शेपूट पकडून त्याला दूर फेकून दिले. तेव्हा शिक्षकांनी मुख्याध्यापकांनी तीच कौतुक केलं. झाडा फुलांची आवड असणारी चारुलता नेहमी इतरांना मदत करायची. रमा आजी आजारी पडल्यावर त्यांना दवाखान्यात नेले. त्यांना औषधी दिली. आशा गुणी मुलीचे शिक्षण राहू नये म्हणून विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी मदत करून तिला शाळेत आणण्यासाठी सहकार्य केले. जादूचा कंपास ही एक सुंदर कथा असून मनोरंजनाच्या दृष्टीने ही कथा अतिशय सुंदर झाली आहे. प्रज्वल नावाच्या मुलाची ही कथा असून लेखकाने कल्पनेच्या भरारीने कथा अतिशय सुंदररित्या फुलवली आहे. पुणे येथील नावाजलेल्या परीस पब्लिकेशनने या पुस्तकाची साजेशी बांधणी केली आहे. पुस्तकाची गुणवत्ता आणि पानांचा दर्जा त्यांनी केलेल्या मेहनतीची साक्ष देतो. मुंबई येथील प्रसिद्ध बालसाहित्यिक, साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार प्राप्त लेखक एकनाथ आव्हाड यांनी या पुस्तकाला अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली आहे. तर प्रसिद्ध चित्रकार माननीय श्री. गिरीपर्ण यांनी विषयाला अनुरूप काढलेल्या आकर्षक मुखपृष्ठाने व आतील चित्रांनी पुस्तकाच्या उंचीत मोलाची भर घातली. बालसाहित्यिक उत्तम सदाकाळ यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा..! ------------------------------

सचिन बेंडभर पाटील
कार्यकारणी सदस्य,
अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे.

# उज्जैनकर फाउंडेशनचे ऐतिहासिक संमेलन आळंदी देवाची येथे उत्साहात संपन्न

## ग्रिनिक वर्ल्ड बुक आणि लिम्का बुकमध्ये मध्ये नोंद

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या 750 आणि आदिशक्ती संत मुक्ताई यांच्या 745 व्या सप्तशतकोत्तर जन्म महोत्सवी वर्षानिमित्त शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन, मुक्ताईनगर जिल्हा जळगाव आणि महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आणि श्री ज्ञानेश्वर चरित्र समिती व श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था आळंदी देवाची यांच्या सौजन्याने तिसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज साहित्य नगरी आणि जगद्गुरु तुकाराम महाराज व्यासपीठ, मोरया मंगल कार्यालय, आळंदी देवाची येथे आळंदीतील नागरिक बंधूभगिनी,विद्यार्थी ,शिक्षक ,पत्रकार, समाजसेवक, वारकरी, टाळकरी, प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी, आणि महाराष्ट्रातील उज्जैनकर फाउंडेशनचे विविध जिल्ह्यातील पदाधिकारी, साहित्यिक, रसिकांच्या मोठ्या उपस्थितीमध्ये उत्साहात संपन्न झाले .या संमेलनाचे उद्घाटक सुप्रसिद्ध निवेदक तथा मुलाखत कार पुणे येथील सुधीर गाडगीळ यांच्या शुभ हस्ते संमेलनाचं उद्घाटन करण्यात आले. या संमेलनाचे अध्यक्ष नाशिक येथील कवयित्री प्रा.सुमतीताई पवार संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ.सुरेंद्र हेरकळ, मंडळाचे माजी सदस्य तथा साहित्यिक विलास सिंदगीकर विद्यमान सदस्य डॉ.राजेश गायकवाड संमेलनाचे संयोजक प्रकाश काळे, संमेलनाचे कार्याध्यक्ष सुरेश वडगावकर, संमेलनाचे निमंत्रक रूपालीताई चिंचोलीकर, संमेलनाचे सहसंयोजक अजित वडगावकर, संमेलनाचे सहकार्यध्यक्ष रामचंद्र कुऱ्हाडे पाटील खामगाव येथील संमेलनाचे कार्याध्यक्ष, सहसंयोजक डॉ.ज्ञानेश्वर पाटील, उद्योजक विनोदभाऊ डीडवाणीया व संमेलनाचे मुख्य आयोजक तथा शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण



उज्जैनकर, फाउंडेशनच्या कार्यकारणी खजिनदार सौ. संगीता उज्जैनकर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रसंगी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आदिशक्ती संत मुक्ताई व जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रसंगी सर्व मान्यवरांचा फाउंडेशन तर्फे मानपत्र, स्मृतीचिन्ह, पुस्तक व विशेषांक भेट देऊन सत्कार करण्यात आला .याप्रसंगी श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे 200 विद्यार्थ्यांनी ग्रंथ दिंडीमध्ये सहभाग नोंदवला .याप्रसंगी येथील शिक्षक विकास शिवले, प्रदीप काळे सर यांनी व सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे विठ्ठल, रुक्मिणी आदिशक्ती संत मुक्ताई, संत ज्ञानेश्वर, संत सोपान देव, संत निवृत्तीनाथ यांचे वेशभूषा केलेले विद्यार्थी आकर्षण ठरले. त्याचप्रमाणे आदिशक्ती संत मुक्ताई यांच्याकडून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांना 750 फूट लांब व 101 किलो वजनाची राखी सुद्धा बांधण्यात आली. जगातील सर्वात लांब व जाड असल्याने त्याची ग्रिनीज वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड व लिंमका बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली. ही राखी संमेलनाचे स्वागताध्यक्ष अध्यक्ष तथा एमआयटी संत ज्ञानेश्वर बी.एड .कॉलेजचे प्राचार्य तथा उज्जैनकर फाउंडेशनचे पुणे जिल्हा अध्यक्ष डॉ. सुरेंद्र हेरकळ सर व विद्यार्थ्यांनी तयार केली या राखीचे सुद्धा या संमेलनात विशेष आकर्षण ठरले. प्रसंगी संमेलनाच्या विशेषांकाचे व फाउंडेशनच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच फाउंडेशनचे तापी पूर्णा राज्यस्तरीय इतर व साहित्य पुरस्कारांनी 31 मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. मान्यवरांनी डॉ. शिवचरण उज्जैनकर यांच्या कार्याचे कौतुक करून हे कार्य अधिकाधिक उंच भरारी घेवो अशी माऊली चरणी प्रार्थना केली. प्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते या संमेलनाचे मुख्य आयोजक डॉ. शिवचरण उज्जैनकर व पत्नी सौ. संगिता उज्जैनकर यांचा शाल, मानपत्र, स्मृतिचिन्ह विशेषांक भेट देऊन सत्कार करण्यात आला. “ओळख श्री ज्ञानेश्वरी” या परीसंवादांमध्ये अध्यक्ष श्री प्रकाश काळे यांच्या अध्यक्षतेखाली व दुसरा परिसंवाद “ताटी उघडा ज्ञानेश्वरा “या विषयावरील दुसऱ्या परिसंवादाचे अध्यक्ष ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली ठेंग महाराज यांच्या अध्यक्षते खाली व ज्ञानेश्वर पाटील व इतर मान्यवरांच्या सहभागाने परिसंवाद रंगले .त्यानंतर बोली भाषेतील सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्यांचे बुलढाणा जिल्हा सदस्य जादूगार डी. चंद्रकांत यांनी कटपुतली शो दाखवून उत्साह निर्माण केला. तसेच दिघी आळंदी येथील महिला मंडळांनी भजनाचा उत्कृष्ठ कार्यक्रम सादर केला. फाउंडेशनचे पदाधिकाऱ्यांनी सुद्धा अभंग, पोवाडे, भक्ती गीत यांनी रंगत आणली. समारोपीय सत्रात फाउंडेशनचे राज्य सल्लागार अकोला येथील ज्येष्ठ साहित्यिक तुळशीराम बोबडे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ता तथा साहित्यिक छत्रपती संभाजी नगर येथील डॉ. शिवानंद भानुसे यांच्या प्रमूख उपस्थितीत समारोपीय सत्र सुध्दा संपन्न झाले.डॉ. भानुसे यांनी उज्जैनकर फाउंडेशनच्या 15 वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या उपक्रमाचे कौतुक केले व मी गेल्या पंधरा वर्षापासून उज्जैनकर परिवाराशी घरोब्याचेचे नाते जोडलेले असून शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनच्या माध्यमातून डॉ. शिवचरण उज्जैनकर सर यांनी व त्यांच्या सौभाग्यवती सौ. संगीता उज्जैनकर यांनी महाराष्ट्र मध्ये असंख्य माणसं जोडलीत व ती टिकून ठेवलीत त्याचा मी साक्षीदार आहे याविषयी सुद्धा त्यांनी आपल्या खास वक्तृत्व शैलीत दोघांचे कौतुक करून अभिनंदन केले .त्यानंतर फाउंडेशनचे राज्य सल्लागार कळवा जिल्हा ठाणे येथील सुप्रसिद्ध कवी डॉ. सतीश सोळांकुरकर यांच्या अध्यक्षते खाली व सहसंयोजक अजित वडगावकर, सुप्रसिद्ध कवी गणेश आघाव व फाउंडेशनचे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत राज्यभरातून आलेल्या येथील कवीं, कवयित्रींनी या कवी संमेलनामध्ये उस्फूर्त अध्यात्मिक कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. प्रसंगी सर्वांचा प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व विशेषांक देऊन गौरव करण्यात आले. संमेलन यशस्वीतेसाठी उज्जैनकर फाउंडेशनच्या राज्य पदाधिकारी व सभासदांचे सहकार्य लाभले.

# चांदवड येथील होळकर वाडा (रंगमहाल)पर्यटन केंद्रावर वाढते गर्दी, होळकर प्रेमींनी आवश्य भेट द्यावी... समाधान

बागल(होळकर वाडा मार्गदर्शक). भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम चांदवड पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीशताब्दी वर्षानिमित्तनिमित्त महाराष्ट्रातुन होळकर प्रेमी हे उत्तर महाराष्ट्राची उपराजधानी म्हणून ओळखणे जाणारी चांदवड होळकर नगरीत येत आहे. आणि या उपराजधानीमधील ऐतिहासिक वास्तू होळकर वाडा (रंगमहाल ) बघण्यासाठी होळकर प्रेमाची गर्दी वाढायला सुरुवात झालीआहेत. यातच नाशिक जिल्ह्यातील शैक्षणिक संस्था ही मुलांना अहिल्यादेवी होळकरांचा इतिहास समजावा. आणि राज्य सरकारने ही वर्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती तीनशे वर्षे पूर्ण होत आहेत त्यानिमित्त त्रिशताब्दी वर्ष म्हणून जाहीर केले आहे. नासिक येथून शैक्षणिक संस्था हा होळकर वाडा रंगमहाल बघण्यासाठी येत आहे. भरपूर संस्था या मुलांना रंगमहाल दाखवून गेल्या आणि मुलांना त्याचा इतिहास जागृत करण्यासाठी या इतिहासाची माहिती घेऊन गेली आहेत नासिक येथील स्वामी विवेकानंद सोसायटीचे श्रीमान त्रिबंकलाल जयरामभाई चौहान (बिटको) माध्यमिक विद्यालय मोरवाडी,नविन सिडको,नाशिक-9 शाळा शुक्रवार दि.०३.०९.२०२४ रोजी वियालयातील इयता ८ वी च्या विदयार्थ्यांना होळकर वाडा (रंगमहाल ) क्षेत्रभेट साठी मुख्याध्यापिका मा.उज्वला माळी शिक्षिका -अलका चंद्रात्रे, चित्रा येवले, प्रिया पवार,



जितेंद्र गायकवाड सर यांनी या रंगमालास भेट दिली सकाळी नऊ वाजेपासून बारा वाजेपर्यंत या होळकर वाड्याची माहिती नासिक जिल्ह्यातील इतिहास अभ्यासक सामाजिक कार्यकर्ते श्री समाधान बागल यांनी या विद्यार्थ्यांना चांदवड च्या बाजूची परिसराची व होळकर वाड्याची माहिती दिली. आत्ताची चंद्रेश्वरी गड अगोदरचे मल्हारगड, त्यावरील असलेले होळकर कालीन टाकसाळ चांदवडी रुपया, सातपुडा रांगेतील असलेल्या टेहळणी केंद्राची तसेच नाशिक जिल्ह्यातील होळकर यांचा इतिहास व पाऊलखुणा ऐतिहासिक बाराव या संदर्भात माहिती दिली. संस्थेचे शिक्षक वर्ग व विद्यार्थ्यांनी यांनी ऐतिहासिक माहिती प्राप्त झाल्या कारणाने श्री समाधान बागल सर प्रशांत वाघ सर यांचे मानले. चांदवड चा इतिहास हा उत्तर महाराष्ट्राची उपराजधानी म्हणून ओळखला जाणारी होळकर नगरी चांदवड या इतिहासाची जागृती व्हावी यासाठी शैक्षणिक संस्थेने या होळकर वाड्यात भेट द्यावी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास जाणून घ्यावा. आणि पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मोत्सवास तीनशे वर्षे पूर्ण होत असल्याकारणाने हे त्रीशताब्दी वर्षे भव्य दिव्य आणि नाशिक जिल्ह्याचा इतिहास संपूर्ण महाराष्ट्राला माहित व्हावा या होळकर नगरीला भेट द्यावी असे आव्हान श्री समाधान बागल यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील होळकर प्रेमींना केला आहे.

# नांदेड शहरात २१ वा मराठा वधुवर परिचय मेळावा उत्साहात संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : मराठा वधुवर सूचक मंडळ नांदेडच्या वतीने आयोजित २१ वा भव्य मराठा वधूवर परिचय मेळावा हनुमान मंदिर मंगल कार्यालय विजयनगर नांदेड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मेळाव्याचे उद्घाटन भाऊराव चव्हाण सहकारी साखर उद्योग समूहाचे उपाध्यक्ष नरेंद्रदादा चव्हाण यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा सरकारी वकील अँड.बी.आर. भोसले हे होते. कार्यक्रमासाठी विशेष अतिथी म्हणून विधान परिषदेचे गटनेते, हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंतभाऊ पाटील, माजी उपमहापौर आनंदराव पाटील चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक उमेश कदम, शिवाजीराव खुडे, इंजी शे रा पाटील, उद्धवराव पाटील सूर्यवंशी, नानाराव कल्याणकर, प्रा.व्यंकट माने,महेश मोरे,मंडळाचे संस्थापक कार्याध्यक्ष संभाजीराव शिंदे, कल्पनाताई डोंगळीकर,अँड एल.जी पुयड,मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम, सतीशकुमार जाधव, प्रल्हादराव दुरपडे शिवाजीराव पाटील ,व्यंकटराव जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन केले. मराठा सेवा संघाचे सचिव रमेश पवार यांनी जिजाऊ वंदना सादर केली. याप्रसंगी हेमंतभाऊ पाटील, नरेन्द्रदादा चव्हाण,बी. आर. भोसले, आनंदराव चव्हाण यांनी समाज बांधवांना मार्गदर्शन केले. मंडळाचे संस्थापक कार्याध्यक्ष संभाजीराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने



या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले होते. या वधूवर परिचय मेळाव्यासाठी नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर या जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा,तेलंगणा, कर्नाटका आदी ठिकाणाहून मोठ्या संख्येने नियोजीत वधूवर आणि त्यांचे पालक आले होते. या मेळाव्यात ७५० वधूवरानी नोंदणी करून ३०० जणांनी प्रत्यक्ष परिचय दिला. मागील वीस वर्षापासून मोफत चालविल्या जाणाऱ्या या उपक्रमाचे मान्यवरांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव प्रा. संतोष देवराये यांनी केले,आभार इंजि. तानाजीराव हुस्सेकर यांनी मानले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन साहित्यिक दिगंबर कदम यांनी केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ८ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com



## सत्संगती यशस्वी जीवनाचा पाया - डॉ. महेश गोलेकर

खर्डा ( प्रतिनिधी) सत्संगती हा यशस्वी जीवनाचा पाया असल्याचे उद्गार संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना काढले. श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय खर्डा व श्री संत गजानन महाविद्यालय खर्डाचे राष्ट्रीय सेवा योजना चे विशेष हिवाळी शिबिर मौजे पांढरेवाडी ता. जामखेड जि. अहिल्यानगर येथे चालू आहे, या शिबिरात व्याख्यानमाला उपक्रम अंतर्गत स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना डॉ. गोलेकर यांनी सत्संग हा माणसाचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी खूपच मोलाचा असल्याचे सांगितले त्यांनी विविध ऐतिहासिक, धार्मिक दाखले देत विद्यार्थ्यांना विषय समजावून सांगितलं तसेच एस. के. एच मेडिकल कॉलेजमध्ये कार्यरत असताना एक रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून आलेले अनुभव सांगताना, राष्ट्रीय सेवा योजना ही संस्कारक्षम विद्यार्थी घडवून राष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलत असल्याचे सांगितले. यावेळी विठ्ठल लोहकरे,भगवान दराडे, नवनाथ गोलेकर व ग्रामस्थ तसेच स्वयंसेवकाची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. मोहसीन शेख यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. भारत मेंगडे यांनी केले.

## आमचा गाव आमचा विकास मोहीमेंतर्गत लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात " शाश्वत विकास ध्येयांच्या ९ संकल्पना" अनुषंगाने विशेष सभा



लिंबागणेश:- ( दि.०७ ) बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.७ मंगळवार रोजी वानखेडे पी.एन. गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांच्या आदेशाने सरपंच बालासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आमचा गाव आमचा विकास (GPDP) सबकी योजना सबका विकास " मोहीमेंतर्गत ग्रामविकास अधिकारी एस.एस.वीर यांनी या मोहिमे अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याच्या " "शाश्वत विकास ध्येयांच्या (SDGs ) नऊ संकल्पना १)गरीबी मुक्त आणि उपजिविका(रोजगार )२) आरोग्यदायी गाव ३)बालस्नेही गाव ४)जलसमृद्ध गाव ५) स्वच्छ आणि हरित गाव ६)स्वयंपुर्ण पायाभूत सुविधायुक्त गाव ७) सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव,८) सुशासन युक्त गाव ९)लिंग समभाव पोषक गाव याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, उपसरपंच बालासाहेब जाधव, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड,अक्षय वाणी,शेख समीर, लक्ष्मण वाणी,सुरेश निर्मळ , दादा गायकवाड,बाळकृष्ण मुळे, तुकाराम गायकवाड, औदुंबर नाईकवाडे, संजय सुकाळे,बबन निर्मळ,कृष्णा गिरे, सोनाजी कुदळे, रंजित साळुंके, संतोष शिंदे आदी उपस्थित होते. प्राथमिक जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हागे यांनी शाळेच्या अनुषंगाने आवश्यक सुविधा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी गर्जे व्ही.श्रीमती जायभाये,श्रीमती शिंदे यांनी वैद्यकीय अधिकारी राऊतमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक मागण्यांचे निवेदन दिले. बैठकीत आवश्यक मागण्यांबाबत ग्रामविकास अधिकारी वीर यांनी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य आणि उपस्थित ग्रामस्थांच्या संमतीने ठराव घेतले.अगदी खेळीमेळीच्या वातावरणात विशेष ग्रामसभा पार पडली.

# रस्ता सुरक्षा अभियानात नियमावलीचे पालन करावे जिल्हाधिकारी अविनाश पाठक

बीड दि.7 :- रस्ता सुरक्षा म्हणजे प्रत्येक नागरिकाच्या जीवाचे संरक्षण, रस्ता सरळ आणि वाहने चालविणे बेताचे असेल तर आपण आपल्या जीविताचे संरक्षण करु शकतो. यासाठी रस्त्यासंतील दुभाजक, स्पीडब्रेकर, वळण रस्ता, चौक अशा ठिकाणी वाहन चालवण्याचे नियम वापरणे गरजेचे आहे. प्रत्येक ठिकाणी कायदा आपले संरक्षण करु शकत नाही तर आपणच घालून दिलेल्या नियमावलीचे पालन करावे, असे प्रतिपादन रस्ता सुरक्षा अभियानाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केली होती त्यावेळी जिल्हाधिकारी




अविनाश पाठक यांनी केले. या बैठकीस खासदार बजरंग सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती तसेच बालाजी धनवे, व्हि. डी. सपकाळे, गणेश जायभाये, शेखर अचार्य विविध विभागाचे संबधित अधिकारी उपस्थित होते. मृत्युदर व अपघाताचे प्रमाण कसे कमी करता येईल यावर पुढील मुद्यांवर आढावा घेतला. रस्ते सुरक्षाबाबत काय उपायोजना केल्या,रत्याची प्रलंबित कामांचे प्रस्ताव नव्याने सादर करावेत, जिल्हा नियोजन समितीमधून निधी मंजूर करता आला तर तशी मागणी करता येईल. जिल्हयातील ब्लॅंक स्पॉटची स्पाटची तपासणी, जिल्हास्तरावर जिल्हा नियोजन समिती अंतर्गत रस्ता सुरक्षा उपाययोजना, जिल्हयातील अपघातांची संख्या कमी करणे, जिल्हयामध्मये होणा-या अपघाताची नोंद, दुभाजके तोडून शासकीय मालमत्तेचे नुकसान करणा-या व्यवसायिक आस्थापनावर कारवाई, ट्रामा केअर सेंटर आणि रस्त्या लगत असणारे प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हयामध्ये होणारी अपघाताची नोंद इराद‍ा या ॲपबेस व वेबबेस प्रणालीवर नोंदविणे, दोषी वाहन धारकावर कारवाई करणे इत्यादी मुद्याचा आढावा या प्रसंगी श्री पाठक यांनी घेतला. प्रस्ताविक व आभार प्रदर्शन कार्यकारी अभियंता व सदस्य सचिव आर.पी तोंडें यांनी केले.

# मुलांनी पालकांना रस्ता सुरक्षा शिक्षण द्यावे -जिल्हाधिकारी अविनाश पाठक

## रस्ता सुरक्षा अभियान 2025 चा शुभारंभ

बीड दि. :- कायद्याचं ऐकण्यापेक्षा पालक आपल्या मुलांचं जास्त ऐकतात असं दिसून आलं आहे त्यामुळे रस्ते सुरक्षेबाबत मुलांनीच आपल्या पालकांना शिक्षण देण्याची आवश्यकता वाटते असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज रस्ता सुरक्षा अभियान 2025 च्या उद्घाटन प्रसंगी केले. गेवराई येथील लालबहादूर शास्त्री चौकात या अभियानाची आज सुरुवात करण्यात आली यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी रॅली देखील काढली होती. रस्ता सुरक्षा अभियान 2025 चे उद्घाटन आज माननीय जिल्हाधिकारी बीड अविनाश पाठक यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत बीड , गेवराई येथील न्यायालयाचे न्यायाधीश, गेवराई श्री वानखडे , श्री तोंडे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड तसेच गेवराई तहसीलदार खोमणे,गेवराई नगर परिषद मुख्याधिकारी विक्रम मांडुरके , गेवराई पोलीस निरीक्षक बागर , न्यू हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक आदि कार्यक्रमास उपस्थित होते. सदर कार्यक्रमाची सुरुवात न्यू हायस्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांच्या रॅली पासून सुरू झाली. सदरची रॅली शाळेपासून सुरुवात होऊन मुख्य बाजारपेठेतून जाऊन नगरपरिषद येथे समाप्त झाली. या अनुषंगाने रॅलीमुळे जनजागृती करण्यास मोठा हातभार लागला. मुख्य कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रजलवाने करण्यात आली.

त्यानंतर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील माने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये माने यांनी वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत प्रबोधन केले. तसेच वाहनांमध्ये सेफ्टी नसून खरी सेफ्टी नियमांमध्ये असल्याचे नमूद केले. बीड कार्यालयामार्फत वर्षभरात रस्ता सुरक्षा विषयक विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती दिली. सदर कार्यक्रम प्रभावीपणे राबवल्यामुळे जिल्ह्यामध्ये अपघाताचे प्रमाण दहा टक्क्याने कमी होण्यास मदत झाल्याचे प्रास्ताविकामध्ये सांगितले. त्यानंतर मागील वर्षी बीड उपप्रादेशिक परिवहन कार्यालया कडून घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वाटपाचा कार्यक्रम झाला. विजेता स्पर्धकास / विद्यार्थ्यास सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र व रोख रक्कम याप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वाटप करण्यात आले.

त्यानंतर माननीय दिवाणी न्यायाधीशश्री वानखडे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी नागरिकांना रस्ते सुरक्षा नियमांचे अनुपालन करण्याचे आवाहन केले आणि कायद्यातील तरतुदींचे मार्गदर्शन केले.

त्यानंतर माननीय पोलीस अधीक्षक बीड नवनीत कॉवत यांनी मनोगत व्यक्त करताना इतर गुन्ह्यातील मृत्यूपेक्षा अपघातातील मृत्यू हे सात पट जास्त असल्याचे नमूद केले. सदरचे अपघाती मृत्यू कमी करण्याकरता वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत त्यांनी उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले. तसेच पश्चिमात्य देशात नागरिक स्वयंशिस्तीने वाहतूक नियमांचे पालन करतात त्याच पद्धतीचे शिस्त आपल्याकडे आवश्यक असल्याचे नमूद केले अध्यक्षीय भाषणामध्ये मान्य जिल्हाधिकारी बीड अविनाश पाठक यांनी पोलीस आरटीओ यांचे नागरिक कमी प्रमाणात ऐकतात मात्र घरातील मुलांचे नागरिक जास्त ऐकतात या अनुषंगाने मुलांनीच पालकांना शिक्षित करावे असे आवाहन केले. तसेच रस्ता सुरक्षा नियमांच्या पालना विषयी मुलांनीच त्यांच्या पालकांना बाबत करण्याबाबत वचन घेतले. अध्यक्ष भाषणात ते पुढे म्हणाले रस्ता सुरक्षा प्रबोधनाचे कार्यक्रम ग्रामीण भागात देखील मोठ्या प्रमाणात आवश्यक असल्याचे प्रतिपादन करून पहिल्यांदा बीड शहराबाहेर तालुक्याच्या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्याचे महत्त्व अध्यक्ष यांनी भाषणात नमूद केले. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बालाजी धनवे सहाय्यक प्रादेशिक पदाधिकारी यांनी केले.

# पत्रकार सचिन पवार राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्काराने नाशिक येथे सन्मानित!

## सन्मान लेखणीचा, विचाराचा, कर्तुत्वाचा!

पाटोदा । प्रतिनिधी पत्रकारिता क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्याबद्दल पाटोदा तालुक्यातील निर्भीड पत्रकार सचिन पवार यांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्काराने नाशिक येथे गौरविण्यात आले. पत्रकार दिनानिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यामध्ये हा गुणगौरव 5 जानेवारी रोजी नाशिक येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दरवर्षी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था नाशिक यांच्याकडून दिला जाणारा पत्रकारिता क्षेत्रातील राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार हा बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील पत्रकार सचिन पवार यांना देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यासाठी खासदार राजाभाऊ वाजे, दर्पणकर बाळशास्त्री जांभेकर संस्थेचे अध्यक्ष महेंद्र देशपांडे, दैनिक सामनाचे मुख्य संपादक मनोज शिंदे, झी 24 तासचे संपादक कमलेश सुतार, गुणवंत कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष भारती चव्हाण, भाजपा प्रवक्ते अजित चव्हाण, उत्तर महाराष्ट्र सौंदर्य सम्राज्ञी निशिगंधा कापडणीस, छंद



दिवाळी अंकाचे संपादक दिनकर शिलेदार यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सन्मान सोहळा संपन्न झाला यावेळी महाराष्ट्र, गुजरात, गोवा, मध्य प्रदेश, इत्यादी राज्यातून समानार्थी या सोहळ्यासाठी उपस्थित होते. सलग तीन वर्षे विविध पुरस्काराने सचिन पवार सन्मानित! पत्रकार सचिन पवार यांनी पत्रकारिता सुरू केल्यापासून हा तिसरा पुरस्कार आहे. सलग तीन वर्षापासून ते पुरस्काराचे मानकरी ठरत आहेत. अंबाजोगाई ते मराठी पत्रकार परिषदेकडून त्यांना सन्मानित करण्यात आले होते त्यानंतर संगमनेर येथे दुसरा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते नाशिक येथे राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्काराने तिसऱ्यांदा सन्मानित झाल्याने त्यांच्या उत्कृष्ट लेखणीवर, विचारावर, कर्तुत्वावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाल्याचे सिद्ध होत आहे.

# रासेयो संस्कारातच सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिर्मितीची बीजे- तहसीलदार गणेश माळी

खर्डा ( प्रतिनिधी ) राष्ट्रीय सेवा योजनेच्या संस्कारातच सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिर्मितीची बीजे पेरली जातात असे उद्गार रासेयो शिबिराच्या समारोप प्रसंगी जामखेडचे तहसीलदार गणेश माळी यांनी काढले. यापुढे बोलताना त्यांनी ही योजना निर्मितीपासून संस्कारक्षम, सामाजिक बांधिलकी जपणारा विद्यार्थी घडवून बलशाली राष्ट्राचा पाया मजबूत करण्यासाठी अतिशय मोलाचे कार्य करत असल्याचे सांगितले. कोणतीही नैसर्गिक आपत्ती देशावर ओढवल्यास या योजनेच्या माध्यमातून घडलेले विद्यार्थी सर्वात अग्रेसर असतात, यावेळी शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे प्रतिपादन तालुका कृषी अधिकारी श्री. रविंद्र घुले यांनी केले.त्यांनी रासेयो स्वयंसेवकांना कृषी संबंधित सर्व शासकीय योजनांची माहिती दिली. श्री छत्रपती शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळाचे श्री छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय व श्री संत गजानन महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दिनांक 31 डिसेंबर 2024 ते 6 जानेवारी 2025 या कालावधीत मौजे. पांढरेवाडी ता. जामखेड जि. अहिल्यानगर या ठिकाणी पार पडले, या शिबिरामध्ये डिजिटल साक्षरता व युवक, स्वच्छ भारत अभियान, कॅशलेस जागरूकता, जलस्त्रोत स्वच्छता,वृक्षारोपण,मृदा व जलसंवर्धन, रोगनिदान शिबिर, व्यसनमुक्ती आदी उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. यावेळी दोन्ही महाविद्यालयाची प्राचार्य प्रा.चंद्रकिशोर बारटक्के, प्रा. डॉ. चंद्रसेन आवारे यांची उपस्थिती होती.




शिबिर यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. भारत मेंगडे व प्रा. मोहसीन शेख यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीकांत तनपुरे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. नकुल खवले यांनी केले. यावेळी दोन्ही महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक यांची उपस्थिती होती. ग्रामस्थांमध्ये अशोक गीते, भगवान दराडे,विठ्ठल लोहकरे, यांच्या बरोबरच ग्रामस्थांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव डॉ. महेश गोलेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## मुंबई येथे अनुभूती महागौरव संमेलन संपन्न !!

टि.एम.जी क्रीयेशन्स व इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने "अनुभूती महागौरव संमेलन" नुकतेच, मुंबई मराठी पत्रकार संघ, मुंबई येथे मोठ्या 'उत्साहात' संपन्न झाला. सदर कार्यक्रमाची 'संकल्पना' एन.डी.खान यांची होती. तर सौ. सलमा खान सदर "महागौरव सोहळ्याच्या आयोजक" होत्या. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यांप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कर्नल रवींद्र त्रिपाठी, जेष्ठ अभिनेत्री नयना आपटे, आंतरराष्ट्रीय किर्तीच्या स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.शुभदा नील, जेष्ठ साहित्यिक डॉ. सादिका नवाब,सहर, बॉलीवूड आणि टॉलीवूड अभिनेते अभंष कुमार, चित्रपट कलाकार अली शेख आणि जेष्ठ लेखक राम मेस्त्री इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात 'अतुलनीय' कार्य करणाऱ्या सेवाव्रतींना "राष्ट्रीय टी.एम.जी सुवर्ण रत्न एक्सलन्स पुरस्कार व राज्यस्तरीय अनुभूती जनसेवा सन्मान" पुरस्काराने, तुतारीच्या जल्लोषाने प्रमुख अतिथींच्या 'शुभ हस्ते' सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे 'प्रास्ताविक' संस्थापक एन.डी.खान यांनी केले. तर कार्यक्रमाचे 'उत्कृष्ट' निवेदन गीताश्री नाईक व योगिनी दुराफे यांनी केले. सदरहू महागौरव संमेलनाचे औचित्य साधून, शब्दश्री विलास देवळेकर लिखित, प्रसिद्ध शाहीर दत्ताराम म्हात्रे यांनी "अनुभूती महागौरव संमेलन" याच्यावर आधारित 'पोवाडा' सादर केला. जागतिक किर्तीचे जादूगार वैभव कुमार व रामदास पारकर यांच्या "म्युझिक -मस्ती- मॅजिक" या कार्यक्रमाने उपस्थित रसिक प्रेक्षक अचंबित झाले. तर एम.वाय.हुसेन यांच्या कोरिओग्राफीच्या मार्गदर्शनाखाली "रॉयल डान्स अकॅडमी" च्या विद्यार्थ्यांनी पेश केलेल्या, नृत्याने उपस्थित भारावून गेले. तसेच पुरस्कार सोहळ्याच्या दरम्यान, डॉ.विजय मोरे, स्वप्निला रोकडे, रामदास पारकर आणि विद्या डोंबे यांनी सादर केलेल्या मराठी व हिंदी गीतांना उपस्थितांनी 'दाद' दिली. सदरहू संमेलनात, प्रमुख अतिथींना आपले मनोगत व्यक्त करताना सदर "महागौरव संमेलनाचे कौतुक" केले. अशा प्रकारच्या पुरस्कार सोहळ्यामुळे 'सामाजिक भान' जपले जात असल्याची, त्यांनी 'भावना' व्यक्त केल्या. यांप्रसंगी डॉ. शिवदास कांबळे यांनी प्रमुख आयोजक सौ.सलमा खान व एन.डी.खान यांच्यावर केलेली "काव्यरचना" सादर केली. तसेच जेष्ठ साहित्यिक अक्षरश्री विलास देवळेकर यांनी एन.डी.खान व सौ.सलमा खान यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सुंदर व सुबक अशी "कवितामय फोटो फ्रेम" त्यांना भेट दिली. सदरहू महागौरव संमेलन यशस्वी करण्यासाठी, डॉ. विजय मोरे, राजकुमार ताकमोगे, डॉ. शैलेंद्र पवार, अक्षरश्री विलास देवळेकर, सौ. मीना ताकमोगे, मोहन जाधव, दिपक कदम, संदीप पाटील आणि प्रतिभा किर्तीकर्वे यांनी 'विशेष परिश्रम' घेतलेत. अक्षरश्री विलास देवळेकर यांनी "अनुभूती महागौरव संमेलन" च्या अद्यक्षराने केलेली काव्यरचने चा फ्लेक्सने सर्वांचे 'लक्ष वेधून' घेत होते. अनेकांनी सदरहू फ्लेक्स सोबत 'फोटोही' काढलेत. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन 'शिस्तबद्ध' पद्धतीने करण्यात आले होते.

# अंशकालीन शिक्षकांची शिक्षण विभागाकडून थट्टा




### विरिष्ठांनी पंचायत समितीची लुडबुड थांबवावी

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार अतिथी शिक्षक निवडण्याचा अधिकार शालेय समितीला देण्यात आले असल्याचे समजते. मात्र शालेय समितीच्या या अधिकारांमध्ये पंचायत समितीकडून लुडबुड होत असल्याचे दिसत आहे. शालेय समिती त्यांच्या स्तरावर योग्य शिक्षकाची नियुक्ती करते आणि केलेल्याही आहेत, मात्र पंचायत समितीकडून त्यांच्यावर निर्णय आणि माणूसही लादला जात आहे. जे नियमाला धरून नाही.

**बीड,/प्रतिनिधी**

अंशकालीन शिक्षक अर्थात अतिथी शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांचा कला, क्रीडा, कार्यानुभव, चित्रकला आणि संगीत यामध्ये सर्वांगीण विकास व्हावा यासाठी नियुक्त केलेले शिक्षक. अशा अनेक शिक्षकांची सध्या उपेक्षा होत असून, २०१२ पासून काम करणाऱ्या शिक्षकांच्या जागी आता दुसऱ्या शिक्षकांना नियुक्ती देण्यात आली आहे. ही नियुक्ती नियमबाह्य असून, पंचायत समिती विभागाने यामध्ये घोळ घातला असल्याचे सांगण्यात येत आहे. सदरील नियुक्तीसाठी अधिकाऱ्यांनी संबंधित शिक्षकाकडून पैसे घेतल्याचीही चर्चा होत आहे. याबाबत शिक्षण विभागाने खुलासा करावा आणि योग्य आणि आगोदरपासून काम करणाऱ्या शिक्षकाला नियुक्ती द्यावी अशी मागणी करण्यात आली असून, याबाबत कोर्टातही जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. शालेय विद्यार्थ्यांचा शालेय स्तरावरच क्रीडा, कला – संगीत, कार्यानुभव – आयसीटी या विषयांमध्ये सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने, शासनाने अंशकालीन शिक्षक घेण्याचे ठरविले आणि त्यांना शालेय शिक्षण समितीच्या मार्फत नियुक्ती देण्यात आल्या. २०१२ मध्ये अनेक शिक्षकांना यासाठी नेमले गेले. मात्र, २०१५ मध्ये शासनाने या विषय शिक्षकांची पदे रद्द केली. या निर्णयात नंतरच्या काळात सुधारणादेखील होत गेल्या. कला–क्रीडा शिक्षकांच्या पदांचे भिजत घोंगडे कायम होते. त्याऐवजी अतिथी शिक्षक ही संकल्पना पुढे आली. या सर्व प्रकारामुळे शाळांतून क्रीडा आणि कला संस्कृतीचा विकास होण्याच्या प्रक्रियेलाच खीळ बसण्याचा धोका निर्माण झाला होता. याशिवाय या विषय शिक्षकांच्या रोजगाराचादेखील मोठा प्रश्न निर्माण झाला होता.

# आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल पुणे, बुलढाणा जिल्ह्यातील कवी निमंत्रित शिवनेरीवर शिवाजी महाराजांना मानवंदना..!

चिखली (६जाने.) जगातील पहिले आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल भिडेवाडा पुणे साठी बुलढाणा जिल्ह्यातून कवींना निमंत्रित करण्यात आले होते यामध्ये प्राचार्य डॉ. पंढरीनाथ शेळके, डॉ. निवृत्ती जाधव ,शाहीर मनोहर पवार, पत्रकार विठ्ठल परिहार, डॉ. मंजुराजे जाधव सिंधखेडकर, व संजय हिवाळे इत्यादि निमंत्रित होते. .दिनांक १जानेवारी २०२५ रोजी मातृतीर्थ बुलढाणा येथून राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांना वंदन करून .दिनांक ०२ जानेवारी रोजी जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांना वंदन करून ,भंडारा डोंगर येथे भव्य आणि दिव्य 150 कोटीचे संत तुकाराम महाराज मंदिर उभारणीस भेट दिली. पुढे याप्रसंगी छत्रपती संभाजी नगर येथील



ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ. सुभाष बागल हे सोबत होते. नंतर आळंदी येथे संत गजानन महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांचे दर्शन झाले. दिनांक 3 जानेवारी 2025 रोजी भिडे वाडा पुणे येथे जाऊन क्रांतीसुर्य सावित्रीबाई ज्योतिराव फुले यांना वंदन करून जगातील पहिले आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल मध्ये निमंत्रित कवी म्हणून हजेरी लावली. आणि कांतीसुर्य सावित्रीबाईंच्या जीवनावर काव्य सादर केले.बुलढाणा जिल्ह्यातील कवी साहित्यिक प्राचार्य डॉ. पंढरीनाथ शेळके, कवी डॉ. निवृत्ती जाधव, शाहीर/ कवी मनोहर पवार, पत्रकार विठ्ठल परिहार डॉ.मंजू राजे सिंधखेडकर ही सर्व साहित्यिक मंडळी पुणे येथे येऊन भिडेवाडा येथे क्रांतीसुर्य सावित्रीबाई फुले यांना मानवंदना करून, प्रत्येकानी कविता सादर केल्या. याप्रसंगी दुबई येथील प्रसिद्ध कवी श्री मनोज भारशंकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल मध्ये जगातील सहाशे कवीं/कलावंतानी संमेलनाचा स्वाद घेतला. दिनांक ४ जानेवारी २०२५ रोजी देवाची आळंदी येथे उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर आयोजित राज्यस्तरीय शिव बाल किशोर मराठी साहित्य संमेलन आळंदी देवाची मध्ये सहभाग घेतला, दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जन्मस्थान शिवनेरी येथे येऊन छत्रपती शिवाजी महाराज जन्म स्थळाचे दर्शन घेतले, आणि त्यांना मानवंदना करण्यासाठी शाहीर डॉ. निवृत्ती जाधव शाहीर मनोहर पवार आणि सोबत डॉ. पंढरीनाथ शेळके ,व पत्रकार विठ्ठल परिहार यांनी मानवंदना म्हणून पोवाडा व स्फूर्ती गीते शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळ शिवनेरी किल्ल्यावर येथे सादर केले.

# आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हल




२ जानेवारी २०२५ चिंचवडला बहिणीच्या घरी मुक्कामी राहून सकाळी पुणे येथे बसने सखी सरोज व कल्पना सह पोहचलो. भव्यदिव्य कार्यक्रमाची उत्सुकता होती. (आस्मादिकाने मुंबई ते पुणे प्रवास येण्या जाण्याची नियोजनाची जबाबदारी नेहमीप्रमाणे घेतली) ३ जानेवारी २०२५ नववर्षातील अतिशय चांगली व अविस्मरणीय सुरूवात #ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने पुणे एस् एम सभागृह येथे #आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हल श्री विजय वडवेराव आयोजित कार्यक्रमात उपस्थित रहाण्याची संधी मिळाली अतिशय सुंदर भव्य दिव्य सोहळा शेकडो सावित्रीबाई नऊवारी ईरकल नेसून कपाळावर आडवी कुंकवाची चिरी लेवून, हाती पुस्तक आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुलेचा जागर असे उत्साहवर्धक वातावरण होते.

आयोजक महात्मा फुले यांच्या वेषात आल्यावर अजूनच जल्लोष वाढला. तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, फातीमा शेख, महात्मा फुले यांच्या वेशभूषेत काव्य सादरीकरण केले सावित्री-ज्योती याचे आद्यक्रांतीगुरू वस्ताद लहुजी साळवे, भारतरत्न डॉ बाबा साहेब आंबेडकर यांचा जयघोषात उद्घाटन झाले. कवी विजय वडवेराव यांचे ध्येयपुर्तीसाठी झपाटलेपण पाहिले. कुणाकडून एक रूपया ही न घेता स्व- खर्चाने एवढ्या भव्य अशा चार दिवसीय कार्यक्रम यशस्वी करून दाखवला याची सर्व प्रसार माध्यमाने दखल घेतली.

भिडेवाड्याचे स्मारक व्हावे यासाठी गेली १२ वर्षे झगडत राहिले. यांत त्यांना यश आले.

भिडेवाडाकार कवी विजय वडवेराव यांनी पुण्यातील देशातील पहिली मुलींच्या शाळेचा इतिहास जतन व्हावा. फुले दाम्पत्याचे कार्य पुढच्या पिढी पर्यंत पोहचवावा. या उद्देशाने,तळमळीने एस् एम सभागृह पुणे येथे काव्य जागर केला. ज्ञानज्योती सावित्री बाई फुले व महात्मा फुले यांची अतिशय सुंदर रांगोळी प्रवेशद्वारावर लक्ष वेधून घेत होती.

देशविदेशातून सहाशे कवींच्या सहभागातून भिडेवाडा व फुले दाम्पत्यावर कविता, एकपात्री, पोवाडा, एकांकिका, नाट्यछटा, लाठीकाठी, दांडपट्टा यांची प्रात्यक्षिक झाली. तसेच सर्व कवींना भारतीय संविधानाची प्रत आणि सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.भारावून टाकणारा कार्यक्रम होता. सुग्रास जेवण नाष्टा याची उत्तम सोय होती. हा २ ते ५ जानेवारी कालावधीत "न भुतो न भविष्यती" असा आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिव्हल पार पडला. अगदी सह्याद्री वाहिनीवर सुध्दा बातमी प्रकाशित झाली. सर्व वृत्तपत्रांनी दखल घेतली. फुले दाम्पत्याचा सर्व संसार सुखाचा त्याग, समाजाचा रोष, घरच्यांचा विरोध,इतके सारे समर्पण आणि समाजसुधारणेसाठी अमूल्य योगदान दिलेले असताना.. फुले दाम्पत्यांना भारतरत्न मिळायलाच हवा यासाठी अभियान राबवणार आहोत असे कवी विजय वडवेराव यांनी सांगितले. जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय फुले दाम्पत्याचा कार्याचा जागर करणारे कार्यक्रम वर्षभर घेतले जातात.

सौ. किशोरी शंकर पाटील विरार




# कु. युवराज्ञी दिगंबर सोनवणे (काव्यराज्ञी) राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्काराने सन्मानित, नाशिक येथे गौरव

साहित्य क्षेत्र आणि कला, सामाजिक कार्य त्याच बरोबर आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा विकास या उल्लेखनीय कामगिरी लक्षात घेऊन दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ नाशिक यांच्या वतीने आज दि. ५ जानेवारी २०२५ रोजी नाशिक येथील होरीझोन अकादमी येथे त्यांना विशेष मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार प्रदान करण्यात आला.: याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ नाशिकचे डॉ. महेंद्र देशपांडे, गुणवंत कामगार मंडळाच्या अध्यक्षा डॉ. भारती चव्हाण, संचालक राजेशजी उपासनी, मॉडेल व मिसेस मलेशिया इंटरनॅशनल डॉ. ज्योती केदारे-शिंदे, दैनिक सामानाचे मुख्य संपादक मनोजजी शिंदे, रोटरी क्लब चे अध्यक्ष ओमप्रकाशजी रावत, भाजप प्रवक्ते अजित चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

## दोन राज्यस्तरीय पुरस्काराची मानकरी ठरणार परिसस्पर्श कादंबरी

गावकुसाचे लेखक गावगाडाकार साहेबराव नंदन [ तात्या ] लिखित, ज्ञानसिंधु प्रकाशन नाशिक प्रकाशित, मुक्तेय निर्मित सौ. पुष्पलता उर्फ आक्का सो. संभाजीराव पगारे. पिंपळनेर यांच्या जिवनावर आधारीत, बहुआयामी, बहुविध प्रासगिक विषयांची एकाच माळेत गुंफन केलेली, वास्तवातली नाइकेच्या भाळीच्या गोंदणाच्या परिसस्पर्शाने तिचा जीवनाचे सोने झाले. ग्रामिण बाजाची, मनोवेधक रंजक ! कुठे आसू तर कुठे हासू. भाव भावनांचा संमिश्र मेळ, अशी ही खादेश विभागातून निर्मित झालेली ग्रामिण कादंबरी परिसस्पर्श सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे. नुकताच या कादंबरीला माणूसकी मल्टीपर्पज फाऊंडेशन मलकापूर जि. बुलडाणा यांचा राज्यस्तरीय निळूभाऊ फुले साहित्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. आता ११ जानेवारी २०२५ रोजी गिरणा गौरव प्रतिष्ठानचा बहुचर्चित मानाचा तुरा खोवला जाणारा, राज्यस्तरीय निळूभाऊ फुले साहित्य वाङ्मय पुरस्कार नाशिक येथील शेकोटी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे. एकाच महिन्यात दोन राज्यस्तरीय पुरस्कारांची मानकरी ठरलेली परिसस्पर्श कादंबरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. लेखक साहेबराव नंदन [ तात्या ] यांचे भरभरून अभिनंदन होत असुन त्यांच्या पुढील साहित्य निर्मितीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. भविष्यात या कादंबरीवर मराठी धारावाही किंवा चित्रपट निघू शकेल. अशी ही वाचकांच्या रसिकांच्या सगळ्यांच्याच मनात घर करून राहिलेली पुरस्कारप्राप्त परिसस्पर्श कलाकृतीचे कौतुक खूप खूप शुभेच्छा प्रा. डी. टी. पाटील [ बल्लकसर ] पिंपळनेर ता. साक्री, जि. धुळे

# नाशिक पंचवटी येथे गिरणा गौरव प्रतिष्ठान द्वारा दोन दिवसीय अखिल भारतीय शेकोटी लोककला साहित्य संमेलनाचे आयोजन.

भारत कवतिके मुंबई कांदविली पश्चमि. शुक्रवार दनिांक १० जानेवारी २०२५ आणि शनिवार दनिांक ११ जानेवारी २०२५ रोजी नाशकि पंचवटी येथे गरिणा गौरव प्रतष्ठिान द्वारा दोन दविसीय अखलि भारतीय शेकोटी लोककला साहत्यि संमेलनाचे आयोजन जेष्ठ उद्योगजक देवकशिनजी सारडा साहत्यि नगरी, भावबंधन मंगल कार्यालय,राका लान्स समोर, पंचवटी नाशकि या ठकािणी आयोजति करण्यात आले आहे.दोन दविस रात्र आणि दविस चालणाऱ्या भरघोस कार्यक्रमात श्री सत्यनारायण पूजा, ग्रंथ दिंडी, शेकोटी लोककला साहत्यि संमेलनाचे उद्घाटन, पोवाडा सादरीकरण, लावणी स्पर्धा, मान्यवरांचे मनोगत मध्ये जाऊ कवतिच्या गावा, तमाशा, शेकोटी संमेलन, जागरण गोंधळ,तळी भरणे, अहरिाणी कवी संमेलन, गझल संमेलन, बालकवी संमेलन, परसिंवाद, नमिंत्रति कवी संमेलन, नाशकि जल्हि्यातील लोककलांचा कृतज्ञता सोहळा, समति पाटील शब्द पेरा साहत्यि पुरस्कार प्रदान सोहळा, सांस्कृतकि कार्यक्रम, परसिंवादामध्ये साहत्यिातील डजिटिल युग संधी की आव्हाने ? स्त्री साहत्यि प्रेरणा की उपहास? कलावंताचा सत्कार, नळिूभाऊ फुले वाङ:मय साहत्यि पुरस्कार, आणि समारोप अशा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.शेकोटी लोककला साहत्यि संमेलनाचे स्वागताध्यक्ष अड.नतिनिभाऊ ठाकरे, संमेलनाचे अध्यक्षा प्रा.सुमती पवार, उद्घाटक रघुवीर खेडकर आणि वशिष अतथिी माधुरी पवार ( लावणी सम्राज्ञी) शविकन्या बढे (ढोलकी साम्राज्ञी) वसंतराव जगताप (अध्यक्ष तमाशा महोत्सव) योगेश चकिटगावकर ( लोक कलावंत). असणार आहेत.स्वागतोत्सुक रवदिंर मालुंजकर,करणि सोनार,व संजय आहेर असणार आहेत,सदर दोन दविस चालणाऱ्या शेकोटी लोककला साहत्यि संमेलनाचे आयोजक गरिणा गौरव प्रतष्ठिान व गरिजा महलिा मंच पदाधकिारी व सदस्य हे आहेत.





This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com